**नि.दि. दा.क्र. ४८७/२०२२**
**मधुकर वि. अण्णाराव**
**नि.क्र. ३४**

वादी करीता सा.क्र.०१

**<u>प्रतिवादींकरिता उलट तपास विधीज्ञ श्री. यु. एस. जाधव यांच्या वतीने पुन्हा शपथेवर सुरू</u>**

१. आम्ही तिघेजण भाऊ नामे मी स्वत:, अण्णाराव व रमेश असून आम्हाला एक रुपाबाई बहिण होत्या. रुपाबाई सध्या हयात नाहीत. रुपाबाई यांना दोन मुले व पती असे वारस आहेत. माझे वडील शंकर यांना लिंबराज म्हणून भाऊ आहेत. माझे वडील व चुलते लिंबराज केव्हा विभक्त झाले ते मी सांगू शकत नाही. माझे वडील शंकर सन २००६ ला मयत झाले. लिंबराज व शंकर यांच्यामध्ये कसलाही वाद नव्हता. माझे वडील शंकर व चूलते लिंबराज यांच्यातील जमिनीच्या वाटपामध्ये माझे वडील शंकर यांना सर्वे क्र.६० मध्ये ७ एकर २३ गुंठे क्षेत्र हिस्स्यास मिळाल्याचे मला माहीत नाही. मी वाणिज्य शाखेत पदवीत्तर शिक्षण घेतले आहे. प्रतिवादींची या दाव्यात लेखी कैफीयत काय आहे ती मी वाचली नाही. माझ्या वडील शंकर यांनी गोविंद सुरवसे यांच्याकडून ७ एकर २३ गुंठे जमीन सन १९७७ ला विकत घेतली होती हे म्हणणे खरे आहे. माझे वडील शंकर यांना १४ एकर ६ गुंठे क्षेत्र होते हे म्हणणे खरे नाही. माझे वडील शंकर यांच्या नावे सर्वे क्र. ६० मध्ये साडे पंधरा एकर जमीन होती. सर्वे क्र.६० चे किती गट पडले हे मला माहीत नाही. गट क्र.१७८ हा सर्वे क्र.६० चा भाग आहे हे म्हणणे खरे आहे.

२. सन २००२ मध्ये मी दावा मिळकत अण्णाराव यांच्याकडून खरेदी केली हे म्हणणे खरे आहे. दावा मिळकत अण्णाराव यांच्याकडून

खरेदी करत असताना अण्णाराव यांच्या नावे गट क्र.१७८ मध्ये साडे दहा एकर जमीन होती. १० एकर २९ गुंठे जमीन अण्णाराव यांच्या नावे कशी आली हे मला माहीत आहे. १० एकर २९ गुंठे जमीन अण्णाराव यांच्या मालकीत येण्यापुर्वी ती माधवराव सुरवसे यांच्या नावे होती. माधवराव सुरवसे यांच्याकडून प्रतिवादी अण्णाराव यांना ती १० एकर २९ गुंठे जमीन केव्हा खरेदी गेली याचा तपशील मला माहीत नाही.

३. माझी बहिण रुपाबाई यांचे निधन माझ्या वडीलांच्या निधनानंतर झाले. माझ्या आईचे निधन वडीलांच्या निधन होण्याच्या अगोदर झाले. माझे वडील, बहिण, आम्ही तिघे भाऊ अशामध्ये लेखी स्वरुपात वाटप झालेले नाही. प्रतिवादी अण्णाराव यांनी दावा मिळकत माझ्या नावे माझ्या वडीलाच्या हयातीत केली.

४. सन २००२ ला मी शेती व्यवसाय करत होतो. आम्हा भावात मी सर्वात धाकटा आहे. दावा मिळकतीचे खरेदीखत होण्यापुर्वी मी व प्रतिवादी अण्णारावमध्ये त्याबाबत लेखी करार झालेला नाही. दावा मिळकत प्रती एकर किती किंमतीत मी विकत घेतली हे माझ्या लक्षात नाही. दावा मिळकतीचा मोबदला खरेदीखत नोंद होत असताना दुययम निबंधकाच्या समोर दिला होता. खरेदीखत किती रक्कमेचे आहे ते निश्चितरित्या मला माहीत नाही. प्रतिवादी अण्णाराव यांना मला माहीत नसलेली मोबदला रक्कम मी दिली हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा म्हणजे फेरफार आहे.

५. माझे बँकेत केव्हापासून खाते आहे ते मी सांगू शकत नाही. दत्ता किसनराव माने माझे चुलत चुलते आहेत. बालाजी बाबूराव देवझे हे शिवपूरचे असून सोसायटीचे चेअरमन होते. प्रतिवादी अण्णाराव यांनी कुठलाही मोबदला न स्वीकारता माझे वडील शंकर यांच्या आग्रहाने दावा मिळकत माझ्या नावे केली हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकत ८१ आर माझ्या नावे झाल्यानंतर आमच्या कुटुंबाचे एकूण क्षेत्र १७ एकर ७ गुंठे झाले हे म्हणणे खरे नाही. माझ्या आई सारजाबाई या मागील १३ ते १४ वर्षांपुर्वी मयत झाल्या. माझ्या बहिण रुपाबाई या कोरोना काळात सन २०२१ ला मयत झाल्या. दावा मिळकतीचे मूळ खरेदीखत मी दाखल करु शकतो. प्रतिवादी अण्णाराव यांनी एकूण क्षेत्र १७ एकर ७ गुंठे चे वाटप व्हावे म्हणून दाखल झालेल्या दाव्याची आदेशीका मला आलेली आहे. ती आदेशिका रमेश यांना आलेली आहे हे मला माहीत आहे. ती आदेशिका रुपाबाई यांच्या वारसांना मिळाली किंवा कसे हे मला माहीत नाही. माझ्या पत्नीचे नाव सुरेखा आहे. मी माझ्या पत्नीच्या नावे सतिश पवार यांच्याकडून २ एकर शेती खरेदी केली आहे. त्या खरेदीची तारीख मला आठवत नाही.

६. दावा मिळकतीत माझे वडील शंकरराव यांच्या सर्व वारसांचा हक्क आहे हे म्हणणे खरे नाही. सन २००२ मध्ये रमेश शंकरराव माने यांच्या नावे शिवपूर शिवारातील गट क्र.१७८ मध्ये जमीन होती. सन २००२ मध्ये रमेश शंकरराव माने यांच्या नावे साडेसात एकर शेती होती. प्रतिवादी क्र.१ अण्णाराव यांच्या १० एकर २९ गुंठे क्षेत्रापैकी दावा मिळकत पश्चिमेस आहे. दावा मिळकतीच्या उत्तरेस माझी स्वत:ची जमीन आहे. सन २००२ मध्ये

दावा मिळकतीच्या उत्तरेकडील क्षेत्र माझे व रमेशमध्ये वाटप होऊन माझ्याकडे आले होते, साक्षीदार पुढे सांगतात की, तसे वाटप प्रतिवादी अण्णाराव यांनी केले होते. प्रतिवादी अण्णाराव यांनी तसे वाटप केले याचा काही लेखी पुरावा नाही. १७ एकर ७ गुंठे क्षेत्र आम्हा सर्वांचे एकत्र कुटुंबाचे आहे हे म्हणणे खरे नाही. गट क्र.१७८ मध्ये मिळकत वाटपाद्वारे माझ्याकडे आली. तशा वाटपाचा दस्त माझ्याकडे आहे. तो मी दाखल करु शकतो. ते वाटप कोणत्या वर्षी झाले ते मला माहीत नाही. वाटपाचा कागद कोणी लिहिला ते मला आठवत नाही. दावा मिळकतीचे मूळ खरेदीखत व वाटणीपत्र मी पुढील तारखेस दाखल करु शकतो.

**प्रतिवादी यांच्या विधिज्ञांच्या तोंडी विनंती वरुन पुढील उलटतपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.11.24 17:16:37 +0530

(रवि वि.पांडे)

दिनांक २४/११/२०२५. दिवाणी न्यायाधीश, व.स्तर निलंगा
जिल्हा लातूर.